REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# रा.रं.बोराडे यांच्या कथांतील ग्रामीण जीवनानुभव

प्रा.अनिलकुमार दडमल
मराठी विभाग प्रमुख, गुलाम नबी आझाद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
बार्शीटाकळी, जि.अकोला

## प्रास्ताविक :



ग्रामीण जीवनाचे चित्रण करण्याची एक समृद्ध परंपरा साठोत्तरी कालखंडात मराठी साहित्यात निर्माण झाली. ग्रामीण संवेदनशीलतेसह ग्रामीण जीवनानुभवाचे प्रत्ययकारी चित्रण ग्रामीण लेखकांनी केलेले आहे. कथा, कविता, कादंबरी, नाटक अशा विविध साहित्यप्रकारातून ग्रामीण जीवनाचे अनुभवविश्व प्रतिबिंबित झालेले आहे. शिक्षणाने आत्मभान निर्माण झालेल्या ग्रामीण तरुणांनी आपल्या सभोवतालच्या वास्तवाचे नेमके आकलन आपल्या लेखनातून सामोरे ठेवले. परिणामत: जे जीवन विश्व मराठी साहित्यापासून अपरिचित होते, त्या जीवनविश्वाचा परिचय मराठी साहित्यविश्वाला नव्याने होऊ लागला. पारंपारिक लेखन प्रवासाला छेद देत नाविन्याचा आविष्कार करणारे ग्रामीण साहित्य तत्कालीन अभिरुचीच्या पसंतीस उतरले. ग्रामीण साहित्याची एक स्वतंत्र चळवळच या काळात निर्माण झाली.

या प्रारंभीच्या ग्रामीण साहित्य लेखनाच्या पिढीतील एक महत्त्वाचे कथा—कादंबरीकार म्हणून रा.रं.बोराडे यांचा नामोल्लेख आवर्जून करावा लागतो. बोराडे यांच्या कथात्मक साहित्यातून सभोवतालच्या ग्रामीण जीवन वास्तवाचे ज्वलंत प्रवाही चित्रण झालेले आहे. ग्रामीण जीवन अनुभवांचे विविध पदर साकार करणाऱ्या अनेक कथा बोराडे यांनी लिहिल्या आहेत. त्यांच्या समृद्ध कथा लेखनातून मराठी कथा समृद्ध झालेली आहे. तसेच मराठवाड्यातील बोलीभाषेचे त्यांनी केलेले उपयोजन मराठी भाषेला परिपूर्ण आणि समृद्ध करणारे आहे. ग्रामीण जीवन हा साहित्य लेखनाचा विषय होऊ शकतो. नव्हे तर तो आहेच, ही जाणीव बोराडे यांच्या कथेने मराठी साहित्य प्रवाहात रूढ केली. बोराडे यांच्या कथा लेखनातून साकार झालेल्या ग्रामीण जीवन अनुभवाचे विविधात्मस्वरूप प्रस्तुत शोधनिबंधाच्या रुपाने विचारात घेता येईल.

मराठी ग्रामीण साहित्याच्या पहिल्या पिढीत आपल्या कथा लेखनाने आपली ओळख निर्माण करणारे बोराडे यांच्या नावावर जवळपास चौदा कथासंग्रह आहेत. या एकूणच कथासंग्रहातून बोराडे यांनी ग्रामीण समाजजीवनात होत जाणाऱ्या बदलांचे साद—पडसाद अत्यंत नेमकेपणाने मांडलेले आहेत.

ग्रामीण जीवनानुभव हा बोराडे यांच्या कथालेखनाचा मूळ गाभाच आहे. ग्रामीण जीवन वगळून बोराडे यांच्या कथेचा विचारच करता येत नाही. ग्रामीण समाजात जन्माला आल्यामुळे आणि ग्रामीण जीवन हाच बोराडे यांच्या जगण्याचा अविभाज्य भाग असल्यामुळे त्यांच्या लेखनातून ग्रामीण समाजाविषयीची कळवळ तसेच ग्रामीण माणसाविषयीचे चिंतन व्यक्त

झालेले आहे. त्यांच्या या लेखन पैलूवर प्रकाश टाकताना वासुदेव मुलाटे लिहतात,''संपूर्ण ग्रामीण जीवन समस्याग्रस्त असून या समस्यांनी ग्रामीण माणसाला विळखा घातलेला आहे, असे त्यांना वाटते. या समस्याग्रस्त जीवनाचे चित्रण ते भविष्यात करू इच्छितात. बोराडे यांच्या या लेखन संकल्पाचे स्वागतच केले पाहिजे. परंतु ग्रामीण लेखकांनी ग्रामीण जीवनातील समस्यांचे, समस्याग्रस्त जीवनाचे चित्रण करून थांबता कामा नये. या समस्यांच्या विळख्यातून ग्रामीण माणसाची सुटका कशी होईल? त्याचे शोषण कसे थांबेल? या संबंधानेही सूचित करणारे, संघर्षाला बळ पुरविणारे लेखन ग्रामीण साहित्यिकांनी करण्याची गरज आहे.''[१] मुलाटे यांनी बोराडे यांच्या लेखन संकल्पाचे स्वागत करून ग्रामीण साहित्यिकांनी आपल्या अभिव्यक्तीमागे कोणती भूमिका स्वीकारली पाहिजे याविषयीचे जे मत अधोरेखित केले आहे. त्या मताचे प्रत्यंतर बोराडे यांच्या कथात्मक साहित्यातून अनुभवास मिळते. म्हणूनच बोराडे हे ग्रामीण जीवन अनुभवाचे सशक्त चित्रण करणारे महत्त्वाचे कथाकार ठरतात.

बोराडे यांच्या एकूणच कथासंग्रहातून वास्तवाचे भावस्पर्शी चित्रण पाहावयास मिळते. ग्रामीण समाज वास्तव, तेथील कर्जबाजारी शेतकरी, त्याचे दारिद्र्य, त्यांचे जीवन आणि त्या जीवनाची चिरफाड करणारे अधिकारी हे अनुभव त्यांनी आपल्या लेखनातून प्रत्ययकारीतीने साकार केले आहेत. प्रारंभीचे कथालेखन ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण करण्यात व्यस्त असलेले दिसून येते. परंतु पुढे पुढे मात्र त्यांची कथा ही ग्रामीण जीवनातील वेगवेगळ्या जीवन अनुभवाचे पैलू शोधताना दिसून येते. ग्रामीण जीवन संस्कृतीचा मूलभूत घटक म्हणजे शेतकरी होय. या शेतकऱ्यांच्या जगण्यातील भाव भावना बोराडे यांनी आपल्या कथा लेखनातून नेमकेपणाने साकार केल्या आहेत. या लेखनातून त्यांची ग्रामजीवनाविषयी असलेली एक निष्ठा दिसून येते. कृषी संस्कृतीशी निगडित असणारे सर्वच घटक बोराडे यांच्या कथा लेखनातून प्रतिबिंबित होत राहतात. ग्रामीण जीवनानुभव व्यक्त करायचे म्हणजे त्या ग्राम संस्कृतीतील भिन्नभिन्न घटकांना अधोरेखित करणे आलेच. त्याचेच वास्तव रूप बोराडे यांच्या पेरणी, ताळमेळ, मळणी, वरात, माळरान, राखण अशा अनेक कथासंग्रहातून पहावयास मिळते. ग्रामीण जीवनाचे वास्तव रूप घेऊन कथा साकार होतात. याविषयी नेमकेपणाने भाष्य करताना डॉ.भीमराव वाघचौरे लिहितात,''ग्रामीण मानवी जीवन चित्रित करायचे किंवा ग्रामीण माणूस प्रकट करायचा म्हणजे तेथील जीवनाला वेढून असलेल्या शेतीचा, पिके, ऊन, वारा, पाऊस इत्यादींचा संदर्भ केवळ अपरिहार्य आहे. म्हणून बोराडे यांच्या कथांची प्रमुख पार्श्वभूमी ही शेती आहे. त्यांच्या हुरडा, वापसा, उन्हाळा, चुंबळ, माघारी अशा अनेक कथांचा यासंदर्भात विचार करता येईल.''[२] वाघचौरे यांनी बोराडे यांच्या कथेतून साकार होणाऱ्या ग्रामीण जीवन अनुभवाची विविधता अधोरेखित केलेली आहे. या विविधतेतूनच खऱ्या अर्थाने बोराडे यांच्या कथा समाजाभिमुख होत गेलेल्या आहेत.

ग्रामीण माणसांची सुख—दु:ख मांडताना बोराडे या माणसांच्या जगण्यात असलेल्या बेरकीपणाचेही तेवढेच कलात्मकतेने दर्शन घडवितात. तसेच ग्रामीण माणसांच्या समाजजीवनात घडणारे वेगवेगळे प्रसंग विनोदाच्या अंगाने अत्यंत नेमक्या पद्धतीने साकार होत जातात. या स्वरूपात साकार झालेल्या कथा बोराडे यांचे ग्राम जीवनाविषयीचे सूक्ष्म अवलोकन दाखवून देणाऱ्या आहेत. ग्रामीण जगण्याला पूर्वापार चालत आलेल्या दुष्काळासारख्या समस्येने हवालदिल झालेल्या माणसांची कारुण्यपूर्ण चित्रणे चुंबळ, देणेकरी, चिरफाड, आग, कांगावा, परवड, खोड, मुरडन, आदी अनेक कथा या अनुषंगाने सांगता येतील की, ज्या कथातून ग्रामीण जगण्याला, तिथल्या चराचराला भाजून काढणाऱ्या दुष्काळग्रस्थांच्या व्यथा—वेदना प्रतिबिंबित झालेल्या आहेत. बोराडे ज्या काळात कथालेखन करू लागले होते, तो काळ दुष्काळाने व्यथित झालेल्या माणसांचे जगणे घेऊन प्रवाही झालेला होता आणि म्हणूनच त्या काळातील वास्तवाचे पडसाद बोराडे यांच्या कथेतून आल्याचे दिसून येते. या समाजातील प्रश्नाला बोराडे यांची कथा कशी भिडते यावर भाष्य करताना भास्कर चंदनशिव लिहितात, ''१९७५ च्या आसपास ग्रामीण साहित्याची चळवळ उदयाला आली. इतिहास क्रमानुसार हे स्वाभाविकपण आहे, हे मान्य केले पाहिजे. महाराष्ट्रात येणारे निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित दुष्काळ प्रामुख्याने शेतकरी, श्रमिकांना गिळंकृत करणारे ठरले. या विपरीतपणाचे ग्रामस्तरीय परिणाम मराठवाड्याला अनेक अंगांनी भेडसावणारे ठरले. त्यातूनच अनेक आंदोलनेही जन्माला आली. तेव्हा वाङ्मय भूमिका संबंधीचा फेरविचार अपरिहार्यच ठरत गेला. ग्रामीण साहित्याची कोंडी फोडून नवे आत्मभान याच काळात प्राप्त झाले. शेतीविषयक अनेक प्रश्न निर्माण झाले. या बदलत्या जाणिवा

आणि अनुभव रा.रं.बोराडे यांच्या कथेनेही काही प्रमाणात स्वीकारल्याचे दिसते.''[३] चंदनशिव यांच्यावरील विवेचनातून महाराष्ट्राच्या ग्रामीण समाज जीवनात घडणाऱ्या बदलांचे साद पडसाद तत्कालीन ग्रामीण साहित्याच्या निर्मितीतून कसे पडत होते ते स्पष्ट होते. याच काळाला समान लेखन करणारे रा.रं.बोराडे यांची कथा ही याच सूत्रातून प्रवाही होते.

बोराडे यांच्या कथा जशा ग्रामीण समाज जीवनातील वास्तवाला घेऊन साकार होतात. तशाच त्या ग्रामीण समाजात जगणाऱ्या स्त्रियांच्या सुखदु:खालाही मुखर करतात. परंपरागत जीवनाला अनुसरून जगणाऱ्या ग्रामीण स्त्रिया या परंपरेच्या पाईक असलेल्या दिसून येतात. या स्त्रियांच्या जगण्यातील चढ—उतार खरेतर त्याकाळात विचारात घेणे महत्त्वाचे होते. समाजात स्त्रीला अत्यंत गौण समजले जात होते. त्या काळात ग्रामीण समाजातील स्त्रीच्या अंतर्बाह्य विश्वाला साकार करताना बोराडे मात्र थोढेही खचत नाहीत. त्यांच्या कथेतून साकार झालेल्या स्त्री व्यक्तिरेखांमध्ये विविधता आणि कमालीची वेधकता दिसून येते. नात्यागोत्यात जखडलेली ग्रामीण स्त्री अनेक प्रथातून चित्रित होते, तर विधवा आणि परित्यक्ता स्त्रिया ग्रामीण जगण्याला कशा पद्धतीने सामोरे जातात तेही अनेक कथांतून पहावयास मिळते. सासुरवाशीन स्त्रीच्या मुख वेदनांना साकार करतानाच पती सन्मुख स्त्रीमनाची भाव स्पंदने ही बोराडे यांची कथा नेमकेपणाने टिपते. पतीत्व जपणाऱ्या अनेक स्त्रिया त्यांच्या वेगवेगळ्या कथातून येतात. एवढेच नव्हे तर बदलत्या काळानुरूप ग्रामीण स्त्रियांच्या जगण्यात होणारा बदलही काही आक्रमक आणि करारी स्त्रियांच्या व्यक्तिचित्रनातून साकार होतो तर स्त्रीच्या समर्पणाची, त्यागाची प्रचितीही अनेक कथातील स्त्री व्यक्तिरेखातून अनुभवास मिळते. स्त्रियांची विविधांगी चित्र साकार करणाऱ्या दुकान, बोळवण, मिरच्याच रान, कमिशन, हुरडा, भेग, धग आदी कथा प्रातिनिधिक स्वरुपात सांगता येतील. स्त्री चित्रणे हा बोराडे यांच्या कथेचा खरेतर प्रधान विशेष म्हणावे लागेल. कारण वेगवेगळ्या भावावस्थेतील स्त्रियांची नेमकी चित्रणे त्यांच्या अनेक कथांतून प्राधान्याने साकार झाली आहेत. ''ग्रामीण स्त्रीच्या मनाचे अनेक परीने होणारी कोंडी, भरले पण, तिच्या व्यथा आणि वेदना यांचे चित्रण बोराडे यांच्या कथेतून येते''[४] हे जे वासुदेव मुलाटे यांचे मत आहे, ते त्यांच्या कथा लेखनातून सहजासहजी प्रत्ययास येते.

## समारोप

सारांश रूपाने असे सांगता येते की, बोराडे यांच्या कथालेखनाचा परीघ विस्तारित स्वरूपाचा असून त्यांच्या कथा या ग्रामीण जीवन अनुभवाच्या पार्श्वभूमीवर साकार होतात. विशेषत: मराठवाड्यातल्या ग्रामीण समाज जीवनातील विविध पदर बोराडे अत्यंत कलात्मकतेने आपल्या कथेतून साकार करतात. तसेच ग्रामीण माणूस, त्याचा शेती व्यवसाय, त्या शेती व्यवसायाशी निगडित असलेले इतर बलुतेदार आणि त्याचबरोबर शेतकऱ्याच्या हातात हात देऊन त्याच्या सुखदु:खात सहभागी होणारी स्त्री अशा मूलभूत घटकांच्या अनुषंगाने बोराडे यांची कथा विकसित व विस्तारित झालेली आहे. म्हणूनच त्यांच्या ग्रामीण जीवन अनुभवांची अभिव्यक्ती ही मराठी कथेला समृद्ध करणारी ठरते.

## संदर्भ :


१. डॉ.वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.२००५, पृ.२५२.
२. डॉ.भीमराव वाघचौरे, रा.रं.बोराडे यांचे साहित्य स्वरुप आणि आस्वाद, विहित प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ.१९९९, पृ.११.
३. भास्कर चंदनशिव, घर—शिवार, संपा.चंद्रकुमार नलगे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.१९९९, पृ. ५३.
४. डॉ.वासुदेव मुलाटे, ग्रामीण कथा : स्वरुप आणि विकास, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, द्वि.आ.२००५,पृ.२५४.